सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ९० | रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com




मित्रांनो, दीर्घकाळानंतर पालिकेच्या निवडणुका होत आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे होणाऱ्या पालिका निवडणुकांच्या तुलनेने यंदाच्या निवडणुकीत भावी नगरसेवक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून जास्त प्रमाणावर आणि प्रबळ इच्छाधारी होऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. प्रमुख नेत्यांसाठी ही निवडणूक आता कमालीच्या प्रतिष्ठेची झाली आहे. निवडणूक जस- जशी जवळ येईल तस- तसे कडाक्याच्या थंडीतही वातावरण कमालीचे तापेल. प्रसंगी शाब्दिक संघर्षाच्या आणि खुन्नसच्या ठिणग्याही उडतील. ही वस्तुस्थिती असली तरी आपल्या शहराला सुसंस्कृत व शालीन शहर म्हणून ओळखले जाते. आपल्या शहराच्या या ओळखीला कोठेही तडा जाऊ नये, ही आपली सर्वांचीच नैतिक जबाबदारी आहे. पोलीस व प्रशासन त्यांचे कर्तव्य चोख बजावतीलच. मात्र, त्याच्यापेक्षाही शहरातील तमाम नागरिकांची भूमिका व कर्तव्य अधिक महत्वपूर्ण आहे.

कुठलाच कार्यकर्ता चुकीचा नसतो. प्रत्येक कार्यकर्ता त्याच्या आवडत्या नेत्याच्या वक्तृत्वावर, कार्यशैलीवर व विचारसरणीने प्रेरित असल्यामुळे त्या नेत्याचा व पक्षाचा समर्थक बनतो. मात्र, समर्थनाच्या नादात तो आपले मित्र, नातेसंबंधी, आपल्या सुखदुःखात मदत करणारे, यांना सुद्धा शत्रू समजू लागतो. ही बाब त्याच्या भावी जीवनासाठी अनेकार्थी अतिशय अयोग्य आहे. त्यामुळे जो निकाल लागेल तो खिलाडू वृत्तीने मान्य करा.निकालामुळे आपले वैयक्तिक हितसंबंध बिघडू देऊ नका. या बाबत मोठ्या पक्षप्रमूखांचे आणि नेत्यांचे अनुकरण करावे . राजकारणात कधीच कुणाला नेहमीसाठीचा मित्र किंवा शत्रू मानू नये .

मोठ्या व खुल्या दिलाने विजेत्यांचे अभिनंदन करा. कोणालाही काही वाईट बोलुन, भांडणे करुन संबंध बिघडवू नका. शेवटी कुणीतरी एकच उमेदवार जिंकणार, हार- जित होत राहणार. पदे, सत्ता, खूर्च्या, नेते, पक्ष येत राहतील... जात राहतील... बदलत राहतील... या सर्वांमध्ये मात्र आपल्या सर्वांचा एकच पक्ष ठेवा. जो आयुष्यभर सुख- दुःखात उपयुक्त ठरणार आहे, तो म्हणजे "मित्रपक्ष...!!"

आजचे अभीष्टचिंतन





श्री. हेमंत पवार

बिल्डर्स अँण्ड डेव्हलपर्स, अमळनेर



श्री. महेश पाटील

नेटवर्क मार्केटर, अमळनेर



श्री. रवीकुमार चौधरी

सामाजिक कार्यकर्ता, अमळनेर

## अमळनेर पालिका निवडणूक

# उत्सुकता काही तासांची; आज फैसला, सट्टेबाजीला उधाण!

## प्रशासन सज्ज; १२ टेबलवर होणार मतमोजणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिका निवडणुकीसाठी बुधवार, दि. ३ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया राबविली गेली होती. त्यात मतमोजणी रविवार, दि. २१ डिसेंबर रोजी इंदिरा भुवन येथे होणार आहे. यासाठी प्रशासनाची तयारी पूर्ण झाली आहे. निकालात लोकनियुक्त नगराध्यक्षपदासह १८ प्रभागांतील ३५ उमेदवारांचे भवितव्य सिद्ध होणार आहे. दुपारी १ वाजेपर्यंत सर्व निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. एकूण १२ टेबलवर मतमोजणी होणार आहे. तत्पूर्वी प्रभाग क्र.८ (अ) मधून शविआचे सचिन बळवंत पाटील हे बिनविरोध निवडून आलेले आहेत. दरम्यान, पालिकेवर कोण नगराध्यक्ष म्हणून विराजमान होणार व कोणाची सत्ता पालिकेत येणार याकडे संपूर्ण शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

मतमोजणी प्रक्रियेत सर्वप्रथम पोस्टल मतदानाची मोजणी होणार आहे. यासाठी स्वतंत्रपणे दोन टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानंतर लोकनियुक्त नगराध्यक्षपदासह १८ प्रभागांची मतमोजणी होईल. यासाठी १२ टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त दोन टेबल राखीव ठेवण्यात आले आहे. एका वेळी दोन प्रभागांची मतमोजणी होणार आहे.

**मतमोजणीसाठी १२० कर्मचारी**

मतमोजणी प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी सुमारे १२० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणी प्रक्रिया पारदर्शक पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी निवृत्ती गायकवाड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्पेशकुमार सुराणा व गणेश शिंदे यांनी दिली आहे.

### प्रभाक एकसाठी (अ) ५८. ७९ टक्के मतदान

अमळनेर : न्यायालयीन प्रक्रियेमुळे येथील पालिकेची प्रभाग क्र. १ची (अ) निवडणूक स्थगित करण्यात आली होती. यासाठी शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी ५८. ७९ टक्के मतदान शांततेत झाले. एकूण ५ हजार ८८० मतदारांपैकी ३ हजार ४५७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला. यात १ हजार ७६५ पुरुष, तर १ हजार ६९१ महिला व १ इतर मतदाराचा समावेश आहे. प्रभाग १ मध्ये तांबेपुरा, आयोध्या नगर, रामवाडी, बंगाली फाईल, गायत्री नगर, समता कॉलनी, टाकी फाईल, आयडीपी कॉलनी भागाचा समावेश होता. प्रताप हायस्कूल येथे २ आणि शिवाजी हायस्कूल येथे ४ असे एकूण ६ मतदान केंद्रांवर हे मतदान झाले. या एका जागेसाठी तीन महिला उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. यात शिवसेनेच्या सरिता पवार, शहर विकास आघाडीच्या कविता राजपूत तर अपक्ष शालिनी कदम यांचा समावेश आहे.

### सट्टेबाजांनी सस्पेन्स ठेवला कायम!

राज्यभरासाठी जाहीर झालेल्या पालिका निवडणूक कार्यक्रमांन्वये मतदान बुधवार, दि. ३ डिसेंबर रोजी झाले आहे. मात्र, नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीपासूनच कोण विजयी होणार? यासाठी सट्टाबाजी सुरू झाली आहे. मध्यंतरी काही उमेदवारांच्या हरकतीवरून निवडणूक निकाल ४ डिसेंबर ऐवजी आता २१ डिसेंबर रोजी लागणार आहे. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात राजकीय सट्टेबाजी काही प्रमाणात थंडावली होती. गेल्या ३ ते ४ दिवसांपासून या सट्टाबाजीला आता पुन्हा उधाण आले आहे. त्यात खास करून नगराध्यक्षपदासाठी अधिक सट्टेबाजी होत आहे. ज्या प्रभागांमध्ये अत्यंत चुरशीच्या व प्रतिष्ठेच्या लढती आहेत तेथील उमेदवारांवरही काही प्रमाणात सट्टाबाजी झाली आहे व होत आहे. दरम्यान, नगराध्यक्षपदासाठी कोणाला जास्त भाव देण्यात आला आहे ? ही बाब मात्र कमालीची गोपनीय ठेवण्यात आली आहे. काहींनी संभ्रम निर्माण करणारी उत्तरे देऊन सस्पेन्स कायम ठेवला आहे.

## खानदेश शिक्षण मंडळाची निवडणूक

# सतरा जणांची माघार, २९ उमेदवार रिंगणात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेश शिक्षण मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीच्या विविध पदांसाठी माघारीच्या अंतीमदिनी शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी १७ जणांनी माघार घेतली आहे. २९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

यांनी घेतली माघार

अध्यक्ष- संतोष बाबूराव पाटील, अनिल मधुकर पाटील, किसन देवराम पाटील. उपाध्यक्ष- नगिनचंद ग्यानचंद लोढा, पुरूषोत्तम वसंत शेटे, संदीपकुमार केवलचंद जैन, सुभाष यशवंतराव पाटील व मनिषा विवेकानंद लाठी. विश्वस्त- संतोष बाबूराव पाटील, नगिनचंद ग्यानचंद लोढा, संदीपकुमार केवलचंद जैन, सुभाष यशवंत पाटील. कार्यकारी मंडळ सदस्य- डॉ. रवींद्र काशिनाथ कुळकर्णी, कमल आसकरण कोचर, कल्याणराव वामनराव पाटील, मनिषा विवेकानंद लाठी, विक्रम बिपिनचंद शहा.

हे आहेत रिंगणातील उमेदवार

अध्यक्ष- विनोद जगदीश अग्रवाल, डॉ. रवींद्र काशिनाथ कुळकर्णी, विक्रम बिपिनचंद शहा, विजय जगन्नाथ बोरसे, लालचंद हेमनदास सैनानी, राकेश गिरधरलाल माहेश्वरी, अक्षय नंदकिशोर अग्रवाल. उपाध्यक्ष- सचिन बुधा पाटील, कमल आसकरण कोचर, माधुरी प्रमोद पाटील. विश्वस्तपद- वसुंधरा दशरथ लांडगे, पुरूषोत्तम वसंत शेटे. कार्यकारी मंडळ सदस्य- निशांत राजेंद्र अग्रवाल, योगेश मधुसुदन मुंदडे, पंकज गोविंद मुंदडे, कल्याण साहेबराव पाटील, हरी भिका वाणी, जितेंद्र मोहनलाल जैन, डॉ. अनिल नथ्थू शिंदे, प्रदीप कुंदनलाल अग्रवाल, निरज दीपचंद अग्रवाल, डॉ. संदेश बिपिन गुजराथी, प्रसाद रमेशचंद शर्मा, प्रवीण रामलाल जैन, लीना प्रवीण पाटील, संतोष बाबूराव पाटील, दिलीप हरकचंद जैन, डॉ. अविनाश रघुराज जोशी, जितेंद्र शांतीलाल झाबक.

दरम्यान माघारीनंतर उमेदवारांना अर्ज दाखल केलेल्या क्रमांकानुसार चिन्हाचे वाटप करण्यात आले. अंतीम उमेदवारी यादी उमेदवारांच्या चिन्हासह नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे. निवडणूक उपसमितीचे चेअरमन पंडित चोधरी, सदस्य विवेकानंद भांडारकर, मनोहर महाजन, प्रा. डॉ. सुनील गरुड, खानदेश शिक्षण मंडळाचे चिटणीस प्रा. पराग पाटील, राकेश निळे व भटू चौधरी निवडणुकीचे कामकाज पाहात आहेत.

# सौ. लिनाताई पाटील यांचा झंझावाती प्रचार दिवसेंदिवस ठरतोय प्रभावी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यपदासाठी सौ. लिनाताई प्रवीण पाटील यांची उमेदवारी त्यांच्या झंझावाती व नियोजनबद्ध प्रचार यंत्रणेमुळे दिवसेंदिवस प्रभावी ठरत आहे. सर्वच स्थरातून त्यांना मिळणारा व्यापक प्रतिसाद कौतुकास्पद आहे.



प्रारंभी आशिर्वाद पॅनलची निर्मिती झाल्यानंतर समोर प्रतिस्पर्धी म्हणून कोणी प्रभावी उमेदवार दिसत नव्हते. त्यामुळे निवडणूक बिनविरोध होते की काय अशी चिन्हेही दिसू लागली होती. मात्र, सौ. लिनाताई पाटील यांची दमदार एन्ट्री लक्षवेधी ठरली आहे. सौ. लिनाताई यांचे सासरे उद्योगपती (स्व.) एस.के. अप्पा पाटील दीर्घकाळ खा. शि. मंडळाचे संचालक होते. त्यांचे सहजसाधे व्यक्तिमत्व, त्यांनी केलेले फेलो व त्यामुळे त्यांना प्राप्त झालेला चहात्यांचा मोठा वर्ग या पुण्याईवर दूरदर्शी आणि आक्रमक पावित्रा असलेले त्यांचे सुपुत्र उद्योगपती बिपिनबापू पाटील हेही संचालकपदी विजयी झाले होते. ते अर्बन बँकेचेही संचालक व चेअरमन होते. पालिकेतही स्वीकृत नगरसेवक होते. त्यांना मानणारा मोठा मित्र परिवार आहे. त्यांचा दुसऱ्यांदा संचालकपदी पराभव झाल्यानंतर त्यांनी निवडणूक लढविली नाही. मात्र, खा. शि. मंडळाच्या निवडणुकीत ते प्रत्येक वेळी महत्वाच्या भुमिकेत असत.

बिपिनबापू यांचा व्यावसायिक व्याप वाढल्याने ते त्यात अधिक व्यस्त झाले. परिणामी ते पुन्हा

पान ३ वर

गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा- तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!




# अजातशत्रू विनोद अग्रवाल ठरताहेत अध्यक्षपदाचे भक्कम दावेदार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या अध्यक्षपदासाठी उमेदवारी करीत असलेले विनोद जगदीश अग्रवाल अजातशत्रू असल्याने तसेच सर्वच स्तरावर खूप मोठा मित्र परिवार असल्याने भक्कम दावेदार असल्याची सर्वत्र चर्चा आहे.

विनोद अग्रवाल हे अग्रवाल समाजाचे जिल्हा संघटनमंत्री, लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष, लायन्स क्लबचे झोन चेअरमन, अमळनेर अग्रवाल समाजाचे सेक्रेटरी व भारतीय जनता पक्षाचे माजी शहर उपाध्यक्ष आहेत. या सर्व पदांवर दीर्घकाळापासून कार्यरत राहिल्याने त्यांना राजकीय व प्रशासकीय अनुभवाची चांगलीच जाण आहे.

श्री. अग्रवाल यांना कोणतेही राजकीय पार्श्वभुमी नाही. मात्र, अनेक निवडणुकांमध्ये त्यांनी महत्वपूर्ण भुमिका निभावली आहे. सर्वांना सहकार्य करणारे व कोणीही शत्रू तथा विरोधक नसलेले अशी त्यांची ख्याती आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासूनच त्यांनी वेगाने प्रचार सुरू केला आहे. ते प्रचारासाठी ज्या- ज्या भागात जातात तेथे त्यांच्यासोबत स्थानिक प्रतिष्ठित नागरिक व व्यापारी मोठ्या संख्येने त्यांच्यासोबत असतात. त्यांना सर्वत्र मिळत असलेल्या एकुणच प्रतिसादाच्या पार्श्वभुमीवर श्री. अग्रवाल अध्यक्षपदाचे भक्कम दावेदार म्हणून चर्चेत आहेत.





# अंग्रेजी प्रोफेसर का ' देसी जुगाड़ ' हिट, नारियल के पत्तों से बनाए करोड़ों की कमाई वाले स्ट्रॉ

**सक्सेस स्टोरी**



नई दिल्ली, बेंगलुरु की क्राइस्ट यूनिवर्सिटी में अंग्रेजी के एसोसिएट प्रोफेसर साजी वर्गीस ने नारियल के सूखे पत्तों से इको-फ्रेंडली स्ट्रॉ और पेन बनाकर दुनिया भर में ख्याति कमाई है। उनके स्टार्टअप ' सनबर्ड स्ट्रॉज' ने सिंगल-यूज प्लास्टिक स्ट्रॉ का टिकाऊ विकल्प पेश किया है, जिससे ग्रामीण महिलाओं को रोजगार और पर्यावरण संरक्षण को बढ़ावा मिला है। इस बिजनेस से वे सालाना ७० लाख रुपये कमा रहे हैं, और उनके उत्पादों की मांग अमेरिका, यूरोप समेत कई देशों में है।

### गरीबी से मिली प्रेरणा

विदर्भ के एक गाँव में पढ़ाने के दौरान साजी वर्गीस ने किसानों की आत्महत्याएँ और गरीबी को करीब से देखा। अमेरिकी वैज्ञानिक जॉर्ज वॉशिंगटन कार्वर की जीवनी से प्रेरित होकर उन्होंने ग्रामीण समुदाय और पर्यावरण के लिए कुछ करने का फैसला किया। उनका लक्ष्य ऐसा उत्पाद बनाना था जो ग्रामीण महिलाओं को आय दे और पर्यावरण को लाभ पहुँचाए।

### नारियल के पत्तों का जुगाड़

क्राइस्ट यूनिवर्सिटी परिसर में गिरे नारियल के पत्तों को देखकर साजी को आइडिया मिला। उन्होंने पत्तों को स्टीम करके जलरोधक और टिकाऊ बनाया। सह-संस्थापक एमजी चिराग और यू संदीप के साथ मिलकर उन्होंने ऐसी मशीनें बनाईं, जो बिना केमिकल के पत्तों से स्ट्रॉ और पेन बनाती हैं। इस नवाचार के लिए उन्हें भारतीय और अमेरिकी पेटेंट मिल चुका है।

### ग्रामीण महिलाओं को रोजगार

'सनबर्ड स्ट्रॉज' 'हब-एंड-स्पोक' मॉडल पर काम करता है, जिसमें गाँवों में प्रोसेसिंग सेंटर स्थापित हैं। इससे ११५ से अधिक ग्रामीण महिलाओं को रोजगार मिला, जो पहले बेरोजगार थीं। सेंटर उनके घरों से १० मिनट की दूरी पर हैं, ताकि वे घरेलू काम के साथ नौकरी कर सकें। प्रत्येक महिला को रोजाना 340 रुपये की स्थिर आय मिलती है, जो मौसमी नहीं है।

पर्यावरण और सामाजिक प्रभाव
इस पहल के तीन बड़े प्रभाव हैं:
१) २० लाख से अधिक सिंगल-यूज प्लास्टिक स्ट्रॉ की जगह लेकर समुद्री और भू-प्रदूषण कम किया।
२) ५ करोड़ से ज्यादा नारियल के पत्तों को जलने से बचाया, जिससे ४५१ किलो कार्बन उत्सर्जन कम हुआ।
३) ग्रामीण महिलाओं को स्थिर आय देकर सामाजिक समावेशन को बढ़ावा दिया।

सनबर्ड स्ट्रॉज अब पेन और नारियल से गार्निशिंग स्टिक भी बनाता है। साजी का लक्ष्य अगले तीन साल में 500 महिलाओं को रोजगार देना और फिलीपींस, थाईलैंड जैसे देशों में 'ग्रामीण भारत का ग्लोबल ब्रांड' बनाना है।




# मालिका जिंकताच सूर्यकुमार यादव ट्रॉफी घेऊन ' त्या ' खेळाडूकडे पोहोचला

## पाहून सगळेच हैराण झाले, नेमके काय घडले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अहमदाबादमध्ये खेळल्या गेलेल्या पाचव्या टी २० सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेला ३० धावांनी पराभूत करत पाच सामन्यांची मालिका ३-१ अशी जिंकली. टीम इंडियामध्ये परंपरेनुसार मालिका जिंकल्यानंतर ट्रॉफी संघातील सर्वांत युवा किंवा मालिकेत पदार्पण करणाऱ्या नवख्या खेळाडूला दिली जाते. मात्र यावेळी हा नियम मोडला गेला. शुभमन गिलच्या सल्ल्यावरून कर्णधार सूर्यकुमार यादवने ट्रॉफी थेट ३१ वर्षीय शहबाज अहमदकडे सोपविली. ट्रॉफी मिळताच शहबाज स्वतःही थक्क झालेला दिसला. या खास क्षणाचा व्हिडिओ एका वृत्तवाहिनीने सोशल मीडियावर शेअर केला आहे.

सामन्यानंतर प्रेझेंटेशनमधून ट्रॉफी घेऊन संघाकडे जाताना सूर्यकुमार यादव क्षणभर गोंधळलेला दिसत होता. ट्रॉफी नेमकी कोणाला द्यायची? तेवढ्यात शुभमन गिलने त्याला शहबाज अहमदला ट्रॉफी देण्याचा सल्ला दिला. अक्षर पटेल जखमी झाल्यावर रिप्लेसमेंट खेळाडू म्हणून शहबाजची संघात एन्ट्री झाली होती. मात्र त्याला या मालिकेत एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नव्हती. शहबाज अहमदने आतापर्यंत भारतासाठी दोन टी २० सामने खेळले असून, त्यात त्याने दोन विकेट्स घेतल्या आहेत. २०२३ मध्ये त्याने टी २० आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते.

### सामन्यात काय घडले?

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजीला उतरलेल्या टीम इंडियाने २० षटकांत २३१ धावांचा डोंगर उभारला. शुभमन गिल दुखापतीमुळे बाहेर असल्याने संजू सॅमसनने अभिषेक शर्मासोबत डावाची सुरूवात केली. संजूने २२ चेंडूंत ३७ धावा करत चांगली साथ दिली. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या तिलक वर्माने ७२ धावांची शानदार खेळी साकारली. तिलकसोबत हार्दिक पांड्यानेही महत्त्वाची भूमिका बजावली. हार्दिकने अवघ्या १६ चेंडूंत ५० धावा झळकावत २५ चेंडूंत २५२ च्या स्ट्राइक रेटने ६३ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्यांच्या या इनिंगमध्ये ५ चौकार आणि ५ उंच षटकारांचा समावेश होता. मात्र कर्णधार सूर्यकुमार यादव पुन्हा एकदा अपयशी ठरला. तो केवळ ७ चेंडूंत ५ धावा करून बाद झाला.

२३२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची सुरूवातही आक्रमक झाली. सातव्या ओव्हरमध्ये ६९ धावांवर त्यांना पहिला धक्का बसला. त्यानंतर जसप्रीत बुमराहने धोकादायक क्विंटन डी कॉकला ६५ धावांवर बाद करत सामना फिरविला. अखेर दक्षिण आफ्रिकेला २० षटकांत २०१ धावांपर्यंत मजत मारता आली. भारताने हा सामना ३० धावांनी जिंकत मालिका आपल्या नावावर केली.


# वयाच्या ७१ व्या वर्षी रेखा यांनी उरकले लग्न!

## सर्वांसमोर म्हणाल्या, मी विवाहित... व्हिडिओ पाहून चाहत्यांना बसला धक्का

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूडच्या एव्हरग्रीन अभिनेत्री रेखा यांच्याबद्दल आज सर्वांना माहिती आहे. रेखा यांचे नाव बॉलिवूडच्या अनेक सेलिब्रिटींसोबत जोडण्यात आले. पण कोणत्याही अभिनेत्यासोबत त्यांचे नाते लग्नापर्यंत पोहोचले नाही. अखेर रेखा यांनी उद्योजक मुकेश अग्रवाल यांच्यासोबत लग्न केले. पण त्यांचे लग्न देखील फार काळ टिकले नाही. घटस्फोटाची प्रक्रिया सुरू असतानाच मुकेश यांनी स्वतःचे आयुष्य संपविले. पण आता रेखा यांनी लग्नाबद्दल मोठे वक्तव्य केले आहे. मी विवाहित आहे, असे रेखा म्हणाल्या आहेत. ज्यामुळे चाहत्यांना देखील मोठा धक्का बसला आहे.

सांगायचे झाले तर रेखा यांना नुकता अभिनेत्री महिला चौधरी स्टारर ' दुर्लभ प्रसाद की दुसरी शादी ' सिनेमाच्या स्क्रिनिंग दरम्यान स्पॉट करण्यात आले. सिनेमा शुक्रवार, दि. १९ डिसेंबर रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झाला आहे. सध्या सोशल मीडियावर रेखा आणि महिमा यांचा एक व्हिडिओ तुफान व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये दोघी अभिनेत्री दुसऱ्या लग्नाबद्दल संवाद साधताना दिसत आहेत. अशात रेखा यांनी केलेल्या वक्तव्याने चाहते हैराण झाले आहेत.





### रेखा यांचा लग्नाबद्दलचा अनोखा दृष्टिकोन

व्हायरल व्हिडिओमध्ये महिमा विनोदी अंदाजात म्हणते, ' माझे दुसरे लग्न झाले आहे...' यावर रेखा म्हणतात, ' लग्न पहिले असो किंवा दुसरे...' लग्न तर मी केले आहे, जीवनाशी...लग्न हे प्रेमाचे दुसरे नाव आहे. प्रेम आहे तर लग्न आहे आणि लग्न आहे तर प्रेम आहे...' रेखा यांचे हे वक्तव्य सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. व्हिडिओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंटही केली आहे.

### एकेकाळी चर्चेत होते रेखा यांची लव्हलाईफ...

बॉलिवूडमध्ये सक्रिय असतानाच नाही, तर आता देखील रेखा यांचे खासगी आयुष्य चर्चेत असते. अनेकांसोबत रेखा यांचे नाव जोडण्यात आले. पण महानायक अमिताभ बच्चन यांच्यासोबत असलेल्या रेखा यांच्या नात्याची आजही चर्चा रंगलेली असते. एकवेळ अशी आली जेव्हा बिग बी यांनी रेखा यांना सर्वांसमोर स्वीकारण्यास नकार दिला.

अशात एकट्या पडलेल्या रेखा यांनी उद्योजक मुकेश अग्रवाल यांच्यासोबत लग्न करण्याचा निर्णय घेतला. पण दोघांचे लग्न फार काळ टिकले नाही. अखेर दोघांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. लग्नाला जवळपास सहा महिने झाल्यानंतर कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज दाखल करण्यात आला. पण घटस्फोट होण्याआधीच रेखा यांच्या पतीने आत्महत्या केली. त्यानंतर रेखा यांनी दुसऱ्या लग्नाचा कधी विचारच केला नाही.

# जातिवाचक नावे भूषणावह नाहीत!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात ग्रामीण आणि आता शहरी भागातील रस्ते, गावे आणि वस्त्यांची जातिवाचक नावे भूषणावह नसल्याचे ग्रामविकास विभागाने पत्रकात म्हटले आहे. ही नावे बदलून महापुरुषांची आणि लोकशाही मूल्यांशी निगडित नावे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे जातीय सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

### जातीय नावांचा प्रश्न आणि नवीन निर्णय

ग्रामीण भागात अनेक गावांमध्ये वस्त्या आणि रस्ते आजही जातींवर आधारित ओळखले जातात. या प्रथेमुळे गावातील जातीयता दिसून येते, जी पुरोगामी विचारांना शोभणारी नाही. सामाजिक न्याय विभागाने ११ डिसेंबर २०२० रोजी याबाबत पत्रक काढले होते. २०२१ मध्ये शासकीय परिपत्रक जारी झाले. आता ग्रामविकास विभागाने ठोस आदेश जारी केले असून, ग्रामीण आणि शहरी भागातील जातीवाचक नावे बदलण्याची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे.

### नामकरणाची प्रक्रिया

जातिवाचक नावे बदलण्यासाठी खालील टप्प्या-टप्प्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

**ग्रामसभेचा ठराव :** संबंधित गावातील ग्रामसभेने जातिवाचक नाव बदलण्याचा ठराव मंजूर करावा.

**प्रस्ताव सादर :** हा ठराव गट विकास अधिकाऱ्याकडे सादर करावा.

**तपासणी आणि पाठवणी :** गटविकास अधिकाऱ्याने प्रस्ताव तपासून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे पाठवावा.

**जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी :** मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने तपासलेला प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावा. ज्यांनी त्याला अंतिम मंजुरी द्यावी. या प्रक्रियेद्वारे ग्रामीण भागात ग्रामविकास खाते आणि शहरी भागात नगरविकास खाते नवीन नावे देणार आहे. सामान्य प्रशासन खात्याच्या अंतर्गत गावांच्या नावांबाबत निर्णय घेतले जातात. जिल्हाधिकाऱ्यांना नावे बदलण्याचे अधिकार देण्याचे प्रस्तावित होते, जे आता प्रत्यक्षात येत आहे.

### जातीय नावांचे सामाजिक परिणाम

अनेक गावांमध्ये आजही वस्त्या आणि रस्ते जातींवर आधारित ओळखले जातात. ज्यामुळे सामाजिक व्यवहारात जातीयता दिसून येते. एखादी व्यक्ती कितीही यशस्वी झाली, तरी तिची ओळख तिच्या जातीवरूनच ठरते. ही मानसिकता दूर करण्यासाठी जातिवाचक नावे बदलून महापुरुषांची किंवा लोकशाही मूल्यांशी निगडित नावे देण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. एका सामाजिक कार्यकर्त्याने या निर्णयाचे स्वागत करताना तो त्वरित अंमलात यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. जातिवाचक नावे बदलण्याचा हा निर्णय महाराष्ट्राच्या सामाजिक सलोख्याच्या दिशेने महत्त्वाचा पाय आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील रस्ते, वस्त्या आणि गावांना नवीन, समावेशक ओळख देऊन हा निर्णय जातीय भेदभाव कमी करण्यास आणि राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करण्यास मदत करेल.

# जगाला प्रकाश देणारे : थॉमस अल्वा एडिसन

**वैज्ञानिकांचे बालपण**


थॉमस अल्वा एडिसनचा जन्म ११ फेब्रुवारी १८४७ रोजी अमेरिकेतील ओहायो राज्यातील मिलान या शहरात झाला. लहानपणी त्यांची प्रकृती नाजूक होती. त्यांना थोडे कानाचे आजार होते. त्यामुळे शाळेत त्यांचे लक्ष फारसे लागत नव्हते. शिक्षकांना वाटत असे, की एडिसन अभ्यासात मागे आहे. काही दिवसांनंतर शिक्षकांनी एडिसनच्या आईला एक पत्र दिले. एडिसनने ते पत्र आईला दिले आणि ते वाचताना आईच्या डोळ्यांत अश्रू भरले.

एडिसनने विचारले, " आई, त्या पत्रात काय लिहिले आहे? "

आई म्हणाली, " शाळेतील शिक्षक म्हणतात, की तू खूप हुशार, बुद्धीमान आहेस. तुझ्या बुद्धिमत्तेला सांभाळेल असे शिक्षक आमच्याकडे नाहीत. म्हणून तुला घरी शिकवावे, असे त्यांनी लिहिले आहे."

आईने मुलाच्या मनात कधीच न्यूनगंड येऊ दिला नाही. त्यानंतर एडिसनचे शिक्षण घरीच सुरू झाले. एडिसनची आई नॅन्सी एडिसन त्यांची पहिली शिक्षिका आणि सर्वांत मोठी प्रेरणा बनली. जिज्ञासा एडिसनची खरी ताकद. एडिसन खूप जिज्ञासू होता. नवीन गोष्टी कशा घडतात, कशा चालतात याचा तो सतत शोध घेत असे.

लाकूड का जळते? धूर कसा तयार होतो? वस्तू पेटविल्यावर प्रकाश का होतो? तो लहानपणीच अशा प्रश्नांवर प्रयोग करत असे. एका प्रसंगाने त्याच्या मनात एक चमक आली. एकदा शेकोटी विझविताना त्याने शेकोटीवर माती टाकली. ज्वाला विझल्या, पण लाकूड लालबुंद राहिले. त्यातून त्याला ऑक्सिजन, उष्णता आणि ज्वलन यांचा संबंध समजला. या जिज्ञासेने पुढे जाऊन त्याला विद्युत तारा लालबुंद होतात तेव्हा प्रकाश निर्माण होतो हे समजून घेण्यास मदत झाली आणि याचाच पाया पुढे इलेक्ट्रिक बल्बच्या शोधाकडे गेला आणि जगाला उजळवणारा शास्त्रज्ञ म्हणून तो अजरामर झाला. एडिसनने आयुष्यात जवळपास १,०९३ पेटंट्स मिळविली. इलेक्ट्रिक बल्ब, फोनोग्राफ (आवाज रेकॉर्ड करणारे यंत्र), मोशन पिक्चर तंत्र, इलेक्ट्रिक वीज वितरण प्रणाली, इलेक्ट्रिक पेन, कार्बन मायक्रोफोन यातील प्रमुख आहेत.



आज आपण जगात वापरत असलेल्या अनेक तंत्रज्ञानाची पायाभरणी एडिसनने केली. आईचा विश्वास एडिसनच्या यशामागचे रहस्य म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. एडिसन मोठा झाल्यावर एक दिवस घरात जुनी कागदपत्रे पाहताना त्याला तेच शाळेचे पत्र सापडले. त्यात प्रत्यक्षात लिहिले होते, की " तुमचा मुलगा शिकण्यात खूप अडचणी निर्माण करतो. आम्ही त्याला शाळेत ठेवू शकत नाही. कृपया त्याला घरी शिकवा. " हे वाचून एडिसनच्या डोळ्यांत पाणी आले. आईने खोटे सांगितले नव्हते. आईने विश्वास दिला होता. आईने त्याला ' हुशार आहेस' हे सांगितले नसते, तर कदाचित जगाला प्रकाश देणारा शास्त्रज्ञ जन्मलाच नसता.

**या कथेतून मुले व पालकांना काय शिकायला मिळते?**

मुलांनो, जिज्ञासा ठेवा. प्रश्न विचारा. प्रयोग करा. चुका करताना घाबरू नका. सातत्याने प्रयत्न करत राहिलात तर यश निश्चित आहे.

पालकांनो, मुलांना प्रोत्साहन द्या. त्यांच्या कमतरता नव्हे' तर त्यांच्या ताकदीकडे पाहा. प्रत्येक मुलाची गती आणि समज वेगळी असते. आई-वडिलांचा विश्वास हेच मुलांचे सर्वांत मोठे बळ असते. प्रत्येक मूल वेगळे आहे.

### कथेचा सार

एडिसनची जिद्द, आईचा विश्वास आणि सततची जिज्ञासा या तिघांनी मिळून जग बदलून टाकले. जगात अंधार हटविणाऱ्या बल्बने आधी एका आईच्या सकारात्मक विचारांनी एडिसनच्या मनातील अंधार दूर केला होता.

**- मंगल नागरे-देशमुख**
**जि. प. शाळा कलाली, ता. अमळनेर.**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# द्रौ. रा. कन्या शाळेत क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

## आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग खेळाडू गिरीश पवारांची उपस्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित श्रीमती द्रौ. रा. कन्या शाळेत वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग खेळाडू गिरीश प्रताप पवार यांच्या हस्ते शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी महोत्सवाचे उद्घाटन झाले.

प्रारंभी विजय मारुती मंदिरापासून रॅली काढण्यात आली. यात विभागीय व राष्ट्रीय स्तरावर यश मिळविलेल्या खेळाडू, स्काऊट-गाईड तसेच विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. रॅली शाळा परिसरात आल्यानंतर दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन, मशाल प्रज्वलन व ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी शाळेचा लोगो फुग्यांच्या साहाय्याने आकाशात सोडण्यात आला. कार्यक्रमास राष्ट्रीय खेळाडू विजेंद्र जाधव, योगेश पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. एस. एस. सूर्यवंशी, उपमुख्याध्यापिका श्रीमती एस. पी. बाविस्कर, पर्यवेक्षक एस. पी. वाघ, शिक्षक प्रतिनिधी डी. एन. पालवे, क्रीडा शिक्षक के. आर. बाविस्कर, श्रीमती आर. एस. सोनवणे, एस. एस. माळी व ज्येष्ठ लिपिक शाम पवार उपस्थित होते. यावेळी शाळेतील राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तसेच गाईड विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. नूतन भोई, लक्ष्मी बंजारा, दृष्टी बडगुजर यांच्यासह गाईड शिक्षिका श्रीमती वाय. एम. पाटील यांचा समावेश होता. आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग खेळाडू गिरीश प्रताप पवार यांनी आपल्या क्रीडा प्रवासाविषयी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका सौ. एस. एस. सूर्यवंशी यांनी खेळ व व्यायामाचे महत्त्व सांगितले. श्रीमती आर. एस. सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. डी. एन. पालवे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या सकाळ व दुपार सत्रातील सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

# संपूर्ण आशीर्वाद पॅनलला एकच चिन्ह मिळाल्याने वाढला प्रचाराचा वेग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत कार्यकारी मंडळाच्या संचालकपदासाठी आशीर्वाद पॅनलने हल्ली सत्तेत असलेल्या सात उमेदवारांसह मागील निवडणुकीत निसटता पराभव झालेले जितेंद्र जैन यांना सोबत घेऊन आठ संचालकांचे दमदार पॅनल निर्मिती करून चांगलीच हवा केली आहे. सर्व उमेदवारांनी एकत्रित मागणी केल्यावरून सर्वांना पतंग ही निशाणी मिळाली आहे. त्यामुळे त्यांना आता प्रचार करणे अधिक सुकर होणार आहे. परिणामी आजपासूनच आशीर्वाद पॅनलचा प्रचाराचा वेग वाढला आहे.

राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अत्यंत सक्षम व दिर्घानुभवी उमेदवारांचे पॅनल म्हणून आशीर्वाद पॅनल निर्मितीपासूनच मान्यताप्राप्त झाले आहे. सर्वच क्षेत्रातील दिग्गजांचा त्यांना उघड पाठिंबा आहे. जवळपास सर्वांचीच पारिवारिक पुण्याई खूप मोठी आहे. सर्वांचाच चहाता वर्ग तथा मित्र परिवारही मोठा आहे. खा. शि. मंडळाचे राजकारण आणि निवडणुकीच्या रणनितीचा सर्वांनाच दांडगा अनुभव आहे. सर्वांकडेच मोठी बॅकअप टीम आहे. सर्वात आधी व भरभक्कम पॅनल निर्मिती करून त्यांनी आधीच प्रचारात व वातावरणनिर्मितीत आघाडी घेतली आहे. या पार्श्वभुमीवर आशीर्वाद पॅनलमधील सर्व उमेदवार व त्यांचे नेते आणि समर्थक यांचा विजयाबाबतचा आत्मविश्वास वाढलेला आहे.

### मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे आज मोफत मोतिबिंदू तपासणी शिबिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळ ग्रह सेवा संस्था, ना. गुलाबरावजी पाटील सोशल फाउंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाउंडेशन (धनवाडी) व आर. झुणझुनवाला शंकर आय हॉस्पिटल (पनवेल, नवी मुंबई) यांच्यातर्फे रविवार, दि. २१ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता श्री मंगळग्रह मंदिरात मोफत मोतिबिंदू तपासणी शिबिर होणार आहे. शिबिरात पात्र ठरलेल्या रूग्णांची मोफत शस्त्रक्रिया करण्याची व्यवस्थाही करण्यात येणार आहे. गरजूंनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# कलागुरु ड्रिम सिटीमध्ये घरफोडी

## चांदीच्या मूर्ती, नाणी, दुचाकीची चोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील कलागुरु ड्रिम सिटी परिसरात चोरट्यांनी दोन ठिकाणी घरफोडी केली आहे. यात एका घरातून चांदीच्या मूर्ती, नाणी चोरीस गेली आहेत. दुसऱ्या चोरीत दुचाकी लंपास केली आहे. ही घटना शुक्रवार, दि. १९ डिसेंबर रोजी रात्री घडली. याप्रकरणी येथील पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाली आहे. एकूण ४६ हजार ९०० रुपयांचा ऐवज लंपास झाला आहे.



बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की त्या शुक्रवारी सायंकाळी धुळे येथे त्यांच्या मुलीकडे गेल्या होत्या. त्यांच्या कॉलनीतील वंदना गिरिष बोरसे यांनी त्यांना मोबाईलवरून चोरीची माहिती दिली. त्या घरी परतल्यावर त्यांना हॉलमधील कपाटातील कागदपत्रे व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. किचनमधील देवघराची तपासणी केली असता गणपती, लक्ष्मी, अन्नपूर्णा व शिवपार्वती यांच्या प्रत्येकी ३ तोळे वजनाच्या चांदीच्या चार मूर्ती, १ तोळा वजनाचा चांदीचा बाळकृष्णाचा टोप तसेच लक्ष्मी- गणेश ठसा असलेली तीन व गणपती ठसा असलेले एक असे एकूण चार चांदीचे नाणे चोरीला गेल्याचे निदर्शनास आले.

दुसऱ्या घटनेत विशाल भास्करराव पाटील यांची होंडा शाईन दुचाकी (एमएच१८एएस२२६९) चोरीस गेल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानंतर निंबा नाना कोळी व विकास भिला पाटील यांच्या घराचे कुलूप अथवा सेफ्टी डोअर तोडून चोरी करण्याचा प्रयत्न झाल्याचे उघडकीस आले आहे. सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र पिंगळे तपास करीत आहेत.





### भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्ताची मागणी

अमळनेर : शहरातील विविध भागात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. शाळकरी मुले, वयोवृद्धांना याचा प्रचंड त्रास होत आहे. कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

### सौ. लिनाताई पाटील यांचा झंझावाती प्रचार दिवसेंदिवस ठरतोय प्रभावी

पान १ वरून

राजकीयदृष्ट्या सक्रीय होतील असे फारसे कोणाला वाटत नव्हते. मात्र, त्यांनी त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. लिनाताई यांना अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरवून अनेकांना 'दे धक्का' केले आहे. सौ. लिनाताई याही दीर्घकाळापासून मराठा समाज महिला मंडळ व लायन्स क्लबच्या माध्यमातून सातत्याने सक्रीय आहेत. त्यांचे कणखर व आत्मविश्वासी व्यक्तिमत्व यासोबतच त्यांच्या परिवाराचे सर्वत्र असलेले खूप मोठे राजकीय, सामाजिक व व्यावसायिक वलय ही त्यांच्या जमेची मोठी बाजू आहे. सोबतच बिपिनबापूंची अनुभवी, दूरदर्शी व खंबीर साथ आणि उद्योगपती तथा खा. शि. मंडळाचे माजी संचालक विनोदभय्या पाटील यांचे उघड समर्थन यामुळे सौ. लिनाताई अल्पावधीत अत्यंत प्रभावी उमेदवार म्हणून सिद्ध झाल्या आहेत.

# अमळनेरला युवा परीट धोबी मंडळातर्फे राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराजांना अभिवादन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील युवा परीट धोबी मंडळातर्फे वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवार, दि. १९ डिसेंबर रोजी प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. शहरातील विविध भागात सामाजिक उपक्रमही राबविण्यात आले.

पाच पावली मंदिराजवळील संत गाडगेबाबा महाराज उद्यानातील व संत गाडगेबाबा चौकातील स्मारकावर पूजन व माल्यार्पण करण्यात आले. अरुण अमृत वाघ, माजी नगरसेवक अविनाश जाधव, परशुराम महाले, परीट मंडळाचे अध्यक्ष रवींद्र जाधव, सचिव विजय वाघ, प्रा. अनिल वाल्हे, प्रा. अनिल पवार, अशोक येशी, अनिल मांडोळे, डॉ. हिंमत सूर्यवंशी आदी याप्रसंगी अमळनेर, धरणगाव व नांदेड येथील अनेक मान्यवरांच्या हस्ते विविध उपक्रम पार पडले.

मान्यवरांनी मनोगतात, सांगितले, की राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले थोर समाजसुधारक होते. दलित, पीडित, दीन-दुबळ्यांच्या सेवेसाठी त्यांनी आयुष्य वाहिले. शिक्षण, स्वच्छता, चारित्र्य, अंधश्रद्धा निर्मूलन यावर त्यांनी भर दिला. "देव दगडात नसून माणसांत आहे" हा संदेश त्यांनी कीर्तनातून समाजमनावर कोरला आहे. समाजकार्यासाठी मिळालेल्या देणगीतून त्यांनी अनाथालये, धर्मशाळा, आश्रम व शाळा सुरू केल्या.

दरम्यान, रक्तदात्यांचा सत्कार करून राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराजांची प्रतिमा भेट देण्यात आली. विनोद जाधव, अनिल वाघ, गणेश नेरकर, भरत जावदेकर, दीपक सूर्यवंशी, मनोज चित्ते, दीपक वाल्हे यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# हिवाळ्यात हिरव्या हरभऱ्याची भाजी खाणे आरोग्यासाठी लाभदायक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : हिवाळ्यात हरभऱ्याच्या पाल्याची भाजी खाणे आरोग्यासाठी अतिशय लाभदायक असते. या पार्श्वभुमीवर हिरव्या हरभऱ्याची बाजारात आवक वाढली आहे. हरभऱ्यात कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम, फॉस्फरस, आयर्न, झिंक, मॅगनीज, कॉपर अधिक प्रमाणात असल्याने तिच्या सेवनाने रोगप्रतिकारशक्ती वाढते. हरभऱ्याच्या पानांची भाजीही चवीला अतिशय चांगली असते. यात डायटरी फायबर अधिक असल्याने मानवी शरीरातील साखरेची पातळी नियंत्रित राहते. मधुमेह टाळण्यास मदत होते. या भाजीत मोठ्या प्रमाणात मिनरल्समुळे आरोग्याच्या विविध तक्रारींवर मात करता येते. ओल्या हरभऱ्याची भाजी खाल्ल्याने कोलेस्ट्रॉलही नियंत्रित राहते. हृदयाच्या आजाराचा बचाव करते. यामध्ये अधिक प्रमाणात पोटॅशियम असल्याने रक्तदाब नियंत्रणात राहतो. तसेच कॉपर आणि झिंकमुळे त्वचेची चमक वाढते. भाजीतील आयर्न हे रक्ताच्या कमतरतेपासून बचाव करते. तसेच मधुमेहापासून ते त्वचेच्या अनेक समस्यांपासून सुटका मिळविण्यासाठी भाजी खूप फायदेशीर ठरते. अँटिऑक्सिडंट असतात. यामुळे अनेक आरोग्याच्या तक्रारींवर मात करता येते. ही भाजी मुगाच्या डाळीसोबत तयार केल्यास पित्ताची समस्या दूर होते, असे आरोग्य तज्ज्ञांनी सांगितले.

दरम्यान, तालुक्यात रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात हरभरा पिकाची लागवड होते. सद्य:स्थितीत या पिकाची लागवड झाली आहे. हरभऱ्याचे पीक जोमाने वाढत आहे. कडाक्याची थंडी हरभऱ्यासाठी पोषक मानली जाते. जेवढी थंडी अधिक तेवढे पीक चांगले वाढते.







# ॥ मंगल ॥ पान

## मना सज्जना...

# ' संकल्प, विकल्प असती मनाचे '



समर्थ सद्गुरूंचे स्मरण करून आणि प्रभू श्रीरामचंद्रांना वंदन करून पुढे जाताना समर्थांनी केलेली सूचनाही महत्त्वपूर्ण आहे.

**श्लोक ५**

**मना पाप संकल्प सोडून द्यावा ।**
**मना सत्य संकल्प जीवी धरावा ।**
**मना कल्पना नको ती विषयांची ।**
**विकारे घडे हो जनी सर्व ची ची ॥ ५ ॥**

मानवी मनाचे विश्व मोठे गुंतागुंतीचे असते. मनाने बरी-वाईट कल्पना करावी. ज्ञानेंद्रिय, पंचेंद्रिये यांना आदेश करून ती कल्पना देहाकरवी प्रत्यक्षात आणावी, अशी व्यवस्था असते. यात मनाची तृप्ती असते. या कारणे एखादी कृती करण्याचा संकल्प किंवा विकल्प करावा लागतो. संकल्प आणि विकल्प हे मनाच्या या स्वभावाशी निगडित संकल्पना आहेत.

संत वाङ्मयात या संकल्पना वारंवार भक्तीमार्गाच्या वाटेवर अडथळे म्हणून उल्लेखिल्या गेल्या आहेत. संकल्प म्हणजे मनातील ठाम निर्णय किंवा इच्छा, तर विकल्प म्हणजे त्यातील चंचलता किंवा पर्यायी विचार. जे मनात भ्रम निर्माण करतात. संकल्पात बाधा आणतात.

संत ज्ञानेश्वर माऊलींचा अभंग आहे -

**' संकल्प विकल्प । असती मनाचे ।**
**छेदियले साचे । भवभ्रम ॥ '**

यात मनाचे संकल्प-विकल्प भ्रमाचे मूळ कारण मानले आहे. त्यांचा भेद करून निराभासाची प्राप्ती होत असते. म्हणून समर्थ म्हणतात, की संकल्प हा नेहमी सत्य असावा. पाप घडेल असा संकल्प जाणीवपूर्वक सोडून द्यावा. पाप संकल्पात अनुचित परिणामाची शृंखला असते. सत्य संकल्पाच्या निश्चयाने ती शृंखला खंडित होते. तेव्हा मनुष्याने सदैव सत्य संकल्पाची कामना करावी.

तसेच या श्लोकात समर्थ पुढे सांगतात -

मना... विषय विकाराची कल्पना नको. ज्या कल्पनेने मन विकारी होते. त्या योगे विकृती होऊन वासनेचा प्रादुर्भाव भ्रष्ट आचरणाकडे घेऊन जातो. अशा व्यक्तीला मग समाजात सर्वत्र तिरस्कार वाट्याला येतो. अशा मलीन व्यक्तीला मानसन्मान दुर्लभ होतो.

' ध्यायतो विषयान् ' हे श्रीमद्भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील ६२ व्या श्लोकाचे पहिले शब्द आहेत, जे इंद्रियसुखांच्या चिंतनाने होणाऱ्या पतनाची साखळी सांगतात. विषयांचे, इंद्रियसुखांचे चिंतन करणाऱ्या पुरुषाला त्याबद्दल आसक्ती लागते. आसक्तीने काम (कामना) उत्पन्न होतो आणि कामाने क्रोध उत्पन्न होतो. तेव्हा विषय चिंतन आसक्ती कामना क्रोध संमोह (भ्रम) स्मृतिभ्रंश बुद्धिनाश सर्व नाश. ही क्रमवारी मनाच्या नियंत्रणाचे महत्त्व कथन करते. जी संत साहित्यातील ' मन ' नियंत्रणासाठी करावयाच्या कृतीशी जुळते. ज्ञानेश्वर माऊलींनी आपल्या ज्ञानेश्वरीत या विषय चिंतनासंबंधी आपल्या ओवीत म्हटले आहे.

**जरी हृदयी विषय स्मृती । तरी नि:संगा ही आपजे संगती ।**
**संगे प्रगटे मूर्ती । अभिलाषाची ॥ २१ ॥**
**जेथ काम उपजला । तेथ क्रोधू आधीची आला ।**
**क्रोधी असे ठेवीला । संमोह जाणे ॥ २२॥**
**संमोहा जालिया व्यक्ती । तरी नाशु पावे स्मृति ।**
**चंडवाते ज्योती । हत जैसी ॥ २३ ॥**

जेथे विषय मनात रुजला तेथे अभिलाषा निर्माण होते. काम उत्पन्न झाला की क्रोध उत्पन्न होतो. पुढे संमोह होऊन स्मृतीनाश घडतो. ज्याप्रमाणे वादळात ज्योत विझून जाते आणि अंधकार होतो. त्या प्रमाणे विषय विकार स्मृती नाश करतात.

**विकारे घडे हो जनी सर्व ची ची...**

मानवात सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांचे वास्तव्य असते. यातील जो गुण प्रभावी असेल त्या गुणांच्या प्रभावाखाली त्या व्यक्तीचे मन वर्तन करीत असते.

उदा.- सत्त्व गुण असलेली व्यक्ती शांत, तत्पर, आणि कर्तव्यात दक्ष अशी असते. रजोगुण असलेली व्यक्ती अहंकारी आणि आपलेच म्हणणे खरे असे मानणारी, भांडकुदळ असते. तमोगुणी व्यक्ती आळशी नैराश्याने ग्रस्त आणि तामसी असतात. याचप्रमाणे शरीरात असलेले तीन दोष म्हणजे वात पित्त आणि कफ यांच्या असंतुलनामुळे देखील मनाचे वर्तन साधकबाधक भूमिका घेत असते. त्यातून मनात विकार बळावतात. परिणामी सर्वत्र व्यक्तिचे वर्तन निंदनीय ठरते.

समर्थांनी मानवी मनाचा आणि त्याचे वर्तनाचा सखोल अभ्यास केलेला आहे. त्यातूनच त्यांनी मानवासाठी उपदेशपर लिखाण केले आहे ते आजही आपल्याला मार्गदर्शक ठरते आहे.

**जय जय रघुवीर समर्थ!**

**- भाऊसाहेब देशमुख, अमळनेर**
**मो. : 94203 89541**

# कथा विठ्ठल-रुक्मिणींची...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पूर्वी पुंडलिक नावाचा भगवान विष्णूभक्त होऊन गेला. तो, पत्नी व आई-वडील सत्यवती आणि जानुदेव यांच्याबरोबर दिंडीरवन नावाच्या जंगलात राहत होता. पुंडलिक हा सत्गुणी पुत्र होता. पण त्याच्या लग्नानंतर तो आपल्या आई-वडिलांना वाईट वागणूक देऊ लागला. या वागणुकीला कंटाळून ते काशीला जाण्यासाठी निघाला. हे जेव्हा त्याच्या पत्नीला समजले तेव्हा तीही तिकडे जाण्यासाठी निघाली. ती पतीसमवेत घोड्यावर ते आई-वडील ज्या समूहाबरोबर जात होते तेथे पोहोचले. वाटेत ते एका आश्रमाजवळ पोहोचले. जो ' कुक्कुटस्वामीं 'चा होता. तेथे त्या सर्वांनी एक-दोन दिवस थांबण्याचा निर्णय घेतला. त्या रात्री सारे झोपी गेले. पण पुंडलिकाला झोप लागेना. पहाटे त्याला अस्वच्छ वस्त्रातील काही तरुण स्त्रीया आश्रमात येताना दिसल्या. त्यांनी आश्रम स्वच्छ केला. पाणी आणून स्वामींचे कपडे धुतले आणि त्या बाहेर आल्या व पुंडलिकाजवळून जाऊन त्या अदृश्य झाल्या. पुढील पहाटेही त्याला तेच दिसले. पुंडलिकाने त्यांच्या पायाशी जाऊन त्या कोण आहेत हे सांगण्याची विनंती केली. त्या म्हणाल्या, की त्या गंगा, यमुना आणि इतर पवित्र नद्या आहेत. जेथे भाविक आपली पापे धुतात. त्यामुळेच होतात त्या अस्वच्छ. ' आणि तू आई-वडिलांना वाईट वागणूक दिल्याने महापापी आहेस, ' असे त्या म्हणाल्या. यामुळे त्याच्यात पूर्ण बदल झाला आणि तो चांगला व आज्ञार्थी पुत्र झाला व तो त्यांचा आदर राखू लागला. तेव्हा त्याने आई-वडिलांना



विनंती केली, की यात्रा सोडून त्यांनी पुन्हा दिंडीरवनात यावे. एके दिवशी द्वारकाधीश श्रीकृष्ण (भगवान विष्णू) एकटे असताना त्यांना मथुरेतील दिवसांची आठवण होते. त्यांना आठवतात त्या गोप-गोपिका आणि राधा. जरी ती मृत होती तरी त्यांनी स्वतःच्या दिव्य शक्तींनी तिला पुन्हा जीवंत करून स्वतःजवळ स्थानापन्न केले. तेव्हाच रुक्मिणी कक्षात आल्या आणि राधाने उभे न राहून त्यांचा निरादर केल्याने रुक्मिणींनी रागाने द्वारका सोडली व दिंडीरवनात अज्ञातवासात आली. नंतर भगवान विष्णू तिच्या शोधार्थ प्रथम मथुरा नंतर गोकूळला गेले. गोपाळांना भेटले. मग त्यांनीही शोध सुरू केला. ते शोधार्थ गोवर्धन पर्वतावर गेले. शेवटी ते भीमा (किंवा चंद्रभागा) नदीतीराजवळ आले. सोबत असलेल्या गोपाळांना ' गोपाळपूर ' येथे सोडून स्वतः दिंडीरवन जंगलात तिच्या शोधार्थ निघाले. तेथे रुक्मिणी सापडल्यावर तिचा राग शांत केला. नंतर रुक्मिणीसह तेथेच असलेल्या पुंडलिकाच्या आश्रमात आले. पण तेव्हा पुंडलिक आपल्या आई-वडिलांची सेवा करीत होता. जरी त्याला माहीत झाले, की भगवान विष्णू स्वतः भेटायला आले आहेत, तरी आई-वडिलांच्या सेवेसमोर त्याने तत्काळ भेटण्याचे नाकारून एक वीट त्यांच्याजवळ फेकली त्यावर उभे राहण्यासाठी. पुंडलिकाची आपल्या आई-वडिलांविषयीची श्रद्धा पाहून भगवान विष्णू यांनी विलंबाची पर्वा केली नाही. विटेवर उभे राहून पुंडलिकाची वाट पाहिली. नंतर पुंडलिकाने देवाची क्षमा मागून अशी विनंती केली, की त्यांनी भक्तांसाठी तेथेच असावे. भगवान विष्णूंनी तसे वरदान दिले. तेव्हापासून भगवान विष्णू आहेत विठ्ठल या अवतारात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

' सतयुग ' म्हणजे हिंदू धर्मग्रंथानुसार चार युगांपैकी पहिले आणि सर्वांत शुद्ध, न्यायपूर्ण युग, जेथे सत्य, धर्म आणि शांती नांदत होती; मराठी कथांमध्ये सतयुगाचे वर्णन अनेकदा धर्माचे पालन, नैतिकमूल्ये आणि दैवी घटना याभोवती फिरते. जसे की रामायण आणि महाभारत यांसारख्या महाकाव्यांमधून, ज्यात सतयुगातील राजा-महाराजांच्या कथा, ऋषी-मुनींचे जीवन आणि दैवी अवतार, उदा.- प्रभू श्रीरामचंद्र, भगवान श्रीकृष्ण यांच्या लीलांचा समावेश असतो. जे लोकांना नैतिक मार्गदर्शन करतात आणि कलियुगातील समस्यांवर मात करण्यासाठी प्रेरणा देतात.



## सतयुग...

**स्वच्छ आणि पवित्र जग :** या युगात निसर्ग शुद्ध होता, प्रदूषण नव्हते आणि सर्वत्र शांती होती.

**धर्माचे राज्य :** लोक पूर्णपणे धर्माचे पालन करत, त्यामुळे चोरी, खोटेपणा, लोभ यांसारखे दोष नव्हते.

**दीर्घायुष्य :** माणसे दीर्घायुषी असत आणि त्यांचे जीवन आनंदी व आरोग्यदायी होते.

**दैवी अवतार :** पृथ्वीवर धर्माची स्थापना करण्यासाठी आणि अधर्म वाढू नये म्हणून देव स्वतः अवतार घेत असत. उदा.- विष्णूचे अवतार.

सत्य आणि निष्ठा, सर्व नात्यांमध्ये आणि व्यवहारांमध्ये सत्य आणि निष्ठा होती. मराठी कथांमध्ये सतयुगाचे वर्णन करताना अनेकदा ' रामराज्य ' प्रभू श्रीरामचंद्र यांच्या काळातील राज्य हे आदर्श उदाहरण दिले जाते. जेथे प्रजा सुखी होती आणि राजा न्यायाने राज्य करत होता. संत एकनाथ, तुकाराम यांच्या अभंगांमध्ये किंवा पोवाड्यांमध्येही सतयुगातील आदर्श जीवनाची तुलना कलियुगाशी केली जाते. जेथे लोक पुन्हा सतयुगासारखे जीवन जगण्याची अपेक्षा करतात.

सतयुगाची कथा म्हणजे आदर्श, पवित्र आणि धर्मनिष्ठ जीवनाची कथा आहे. जी मराठी साहित्य आणि लोककथांमध्ये आजही प्रेरणा म्हणून सांगितली जाते.

# निरासक्ती आणि शरणागती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



एकाकडे सुरू होती. त्याने तिची लाकडी मूठ बदलून लोखंडाची केली. दुसऱ्याने चांदीची केली. कुणी सोन्याची केली. मात्र मारल्यानंतर परिणाम एकच! तसा प्रपंच चांगला असला, कसाही असला, तरी तो सुरीच आहे. त्याचा घात सगळीकडे सारखाच! प्रपंचाची आसक्ती म्हणजे त्या सुरीची धार आहे. म्हणून आपला धंदा, नोकरी, सगळे उत्तम करावे. त्यात मागे-पुढे पाहू नये. पण त्यासाठी मी आहे असे नाही समजू कधी. नोकरी ही सुखाकरिता नसून पोट भरण्यासाठी आहे, अशा वृत्तीने जो ती करील त्याला तिची आसक्ती आणि अभिमान राहणार नाही. सावधगिरीने वागावे, भगवंताचे स्मरण ठेवावे, त्याचे नाम घ्यावे; बाकीच्या सगळ्या गोष्टी प्रारब्धावर ठेवाव्यात. यानेच समाधान मिळेल. भगवंताशिवाय समाधान मिळणे शक्य नाही. ' मी समाधान राखून चाललो ' असे म्हणणारा तो जगात धन्य आहे खरा! ही धन्यता यायला भगवंताची अत्यंत आवश्यकता आहे. प्रभू श्रीरामचंद्रांच्या इच्छेने सर्व चालले आहे. प्रभू श्रीरामचंद्र कर्ता आहेत ही भावना ठेवून आपण प्रपंच करूया. प्रयत्न आटोकाट करावा. मात्र फळ देणारा भगवंत आहे, ही भावना ठेवून समाधान टिकवावे.

भगवंताची प्राप्ती व्हायला दुसरे काही नको, शरणागती पाहिजे. मी उपाधिरहित बनणे ही शरणागती आहे. माझेपणाची जी उपाधी आहे ती नाहीशी करायची असेल तर साधन तसेच पाहिजे. इतके उपाधिरहित साधन नामाशिवाय दुसरे कोणतेही नाही. ते साधन तुम्ही करा. भगवंताच्या नामाचे प्रेम यायचे असेल तर अंतःकरण शुद्ध पाहिजे; अंतःकरण द्वेषाने, मत्सराने, अभिमानाने भरलेले असू नये. एकमेकांवर प्रेम करा, घरातून सुरूवात करा. मुलगा आपल्याला सुख देतो म्हणून नाही, पण माझे कर्तव्य म्हणून मी त्याच्यावर प्रेम करीन. निःस्वार्थीपणाने प्रेम करणे हाच परमार्थ आहे खरा. त्यासाठी, प्रभू श्रीरामचंद्र दाता आहेत, पाठीराखा भगवंत आहे, ही जाणीव ठेवून तुम्ही राहा. ही जाणीव निर्माण करण्याकरिता भगवंताच्या नामाची खरी गरज आहे. मनाची शांती मिळवायला हाच मार्ग आहे. दैन्यवाणे कधीच नसावे. अगदी राजाचे वैभव तुम्ही भोगा, पण त्या वैभवाने मी सुखी आहे असे न म्हणता, मी प्रभू श्रीरामचंद्रांचा आहे म्हणून सुखी आहे, ही भावना ठेवून वागा. वैभव आज आहे, उद्या नाही; वैभवावर विश्वास ठेवू नका. मी प्रभू श्रीरामचंद्रांचा आहे या भावनेत तुम्ही राहा. त्यासाठी प्रभू श्रीरामचंद्रांचे नाम तुम्ही घ्या, प्रभू श्रीरामचंद्र कल्याण करतील, हा माझा भरवसा तुम्हीही ठेवा. सुख कशात आहे? सुख हे समजुतीमध्ये आहे आणि भगवंताचे होणे ही समजूत तेवढीच खरी आहे.

# घराचे मुख्य द्वार व त्याचे उपाय

**पूर्व द्वार :** बाहेरून तांब्याचा सूर्य

**उत्तर पूर्व मुखी द्वार:** बाहेरून पितळेची तार

**उत्तर मुखी द्वार:** आतून बाहेरून गणेश प्रतिमा

**उत्तर पश्चिम मुखी द्वार:** बाहेरून स्टीलची तार

**पश्चिम मुखी द्वार:** बाहेरून घोड्याची नाल

**दक्षिण पश्चिम द्वार:** बाहेरून घोड्याची नाल किंवा नावेचा नट किंवा खिळा

**दक्षिण मुखी द्वार:** बाहेरून पंचमुखी हनुमानाची प्रतिमा

**दक्षिण पूर्व मुखी द्वार:** बाहेरून ओम किंवा स्वस्तिक चिन्ह लावणे.

# भगवान विष्णू आणि लक्ष्मी स्वयंवराची अनोखी कहाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मी यांचा वियोग का झाला होता? देवी लक्ष्मींच्या स्वयंवराची अनोखी कहाणी. शुक्रवारच्या सायंकाळी देवी लक्ष्मी यांची पूजा केली जाते. अशी मान्यता आहे, की शुक्रवारी विधीवत पूजा केल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते आणि भक्तांवर पैशांचा पाऊस करते. घरात सुख-शांती आणि समृद्धी बनवून ठेवण्यासाठी भाविक शुक्रवारच्या दिवशी देवी लक्ष्मीची पूजा करतात. अशी मान्यता आहे, की देवी लक्ष्मीची पूजा केल्याने पैशांची कधीही कमतरता भासत नाही.



धर्मग्रंथांमध्ये लक्ष्मीला धन-समृद्धीची देवी मानले जाते. त्यांना भगवान विष्णूंची पत्नी आणि ' आदिशक्ती 'ही म्हटले जाते. धनाची देवी लक्ष्मी यांना प्रसन्न करण्यासाठी लोक अनेक प्रकारचे उपाय करतात. पण देवी लक्ष्मी आणि प्रभू नारायण यांच्या विवाहाची ही अनोखी कथा माहिती आहे.

पौराणिक कथेनुसार देवी लक्ष्मी यांचे स्वयंवर आयोजित करण्यात आले होते. पण देवी लक्ष्मी यांनी आधीच आपल्या मनाचे नारायण यांना स्थान दिले होते. देवी लक्ष्मी यांनी नारायण यांनी आपला पती म्हणून निवडले होते. पण नारद मुनी देखील लक्ष्मी यांच्यासोबत विवाह करण्यास इच्छुक होते. तेव्हा नारदांनी विचार केला, की त्यांना हरिच्या रूपात पाहून देवी लक्ष्मी त्यांचे वरण करतील. तेव्हा नारद हे भगवान विष्णूंकडे गेले आणि त्यांनी हरिप्रमाणे सुंदर रूप मागितले. प्रभू नारायण यांनी त्यांची ही इच्छा पूर्ण करत त्यांना हरि रूप दिले. हरि रूपात नारद जेव्हा राजकुमारी लक्ष्मी यांच्या स्वयंवरात पोहोचले तेव्हा त्यांना विश्वास होता, की राजकुमारी लक्ष्मी त्यांच्याच गळ्यात वरमाला घालेल, पण असे झाले नाही.

राजकुमारीने नारद यांच्या गळ्यात नव्हे, तर नारायण यांच्या गळ्यात वरमाला घातली. त्यानंतर नारदजी तेथून निराश होऊन परतत होते तेव्हा त्यांनी रस्त्यात एका जलाशयात स्वतःचा चेहरा पाहिला. आपला चेहरा पाहून नारद हैराण झाले. कारण त्यांचा चेहरा माकडासारखा दिसत होता.

### हरिचे दोन अर्थ

' हरि 'चा एक अर्थ भगवान विष्णू होतो, तर एक अर्थ माकड असा होतो. भगवान विष्णूंनी नारदाला माकडाचे रूप दिले. नारद यांना कळाले, की भगवान विष्णूंनी त्यांच्यासोबत कपट केला. त्यामुळे नारद अत्यंत क्रोधीत झाले. नारदांनी थेट वैकुंठ गाठले आणि आक्रमक होऊन नारायणाला श्राप दिला की तुम्हाला मनुष्यरूपात जन्म घेऊन पृथ्वीवर जावे लागेल. ज्याप्रकारे मला स्त्री वियोग सहन करावा लागला त्याचप्रकारे तुम्हालाही पत्नी वियोग सहन करावा लागेल. त्यामुळे प्रभू श्रीरामचंद्र आणि सीतेच्या रूपात जन्म घेऊन नारायण आणि देवी लक्ष्मी यांना वियोग सहन करावा लागला होता.

भगवान विष्णू आणि महालक्ष्मी यांच्या कथा विविध पौराणिक कथा, व्रत कथा आणि लोककथांमध्ये आढळतात. ज्यात त्यांच्यातील प्रेम, विरह उदा.- नारदांच्या शापामुळे प्रभू श्रीरामचंद्र- माता सीता यांच्या रूपात विरह आणि पुन्हा मीलन, उदा.- लक्ष्मीनारायण कथा. तसेच देवीच्या वैभवाचे वर्णन करणाऱ्या ' महालक्ष्मी व्रत कथा ' आणि ' वैभव लक्ष्मी व्रत कथा ' यांचा समावेश आहे. या कथांमध्ये विष्णू आणि लक्ष्मीच्या अवतारांच्या माध्यमातून त्यांचे दैवी नाते आणि संपत्तीचे प्रतीक म्हणून लक्ष्मीचे महत्त्व सांगितले जाते.

### लक्ष्मी-नारायण कथा

या कथांमध्ये विष्णू आणि लक्ष्मीचे नित्य नाते, त्यांचे अवतार (रामावतार आणि सीता) आणि त्यांच्यातील प्रेम व त्यांचे कार्य (नारायण म्हणजे पालनकर्ता आणि लक्ष्मी म्हणजे संपत्ती) याचे वर्णन असते. यामध्ये अनेकदा नारदमुनींच्या शापामुळे झालेल्या विरहाची कथाही असते. ज्यात राम-सीता आणि कृष्ण-राधा यांच्या अवतारांचा उल्लेख येतो.

### महालक्ष्मी व्रत कथा

ही कथा एका गरीब ब्राह्मणाच्या धनेश्वराची आहे. ज्याने महालक्ष्मीचे व्रत केले आणि देवीच्या कृपेने त्याला अमाप धनसंपत्ती मिळाली, असे सांगितले जाते. या कथेमुळे लक्ष्मीची कृपा प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे.

### वैभवलक्ष्मी व्रत कथा

ही कथा शुक्रवारच्या व्रताशी संबंधित आहे. ज्यात माता लक्ष्मींच्या वैभवाचे वर्णन असते. यातही भगवान विष्णू आणि लक्ष्मी यांच्या मीलनाचे आणि वैभवाचे प्रसंग येतात. ज्यामुळे घरात सुख-समृद्धी नांदते, असे मानले जाते. कोल्हापूरच्या अंबाबाई (महालक्ष्मी) आणि भगवान विष्णू (बालाजी) यांच्याशी संबंधित कथा : काही कथांमध्ये देवी महालक्ष्मी आणि भगवान विष्णू यांच्यातील प्रेमाचे वर्णन आढळते. जेथे विष्णू तिरुपती बालाजींच्या रूपात असतानाही महालक्ष्मी त्यांच्यासोबत असते, असे सांगितले जाते, विष्णू आणि लक्ष्मीच्या कथा या दैवी प्रेम, संपत्ती आणि वैभवाचे प्रतीक आहेत. या कथांद्वारे भक्तांना लक्ष्मीची कृपा मिळवण्यासाठी आणि जीवनात सुख-समृद्धी आणण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

**(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)**